**-: प्रेस नोट :-** दिनांक:- १६/०९/२०२६

.....................................................................................................................................

**मोबाईल सिम कार्ड व विविध बँक खात्यांचा वापर करून ऑनलाईन सायबर फसवणुक करणाऱ्या ०७ आरोपींना गोवा येथून, मुंबई गुन्हे शाखेकडून अटक केलेबाबत...**

दिनांक ११/०९/२०२६ रोजी गु.प्र.शा. कक्ष ५ यांना मिळालेल्या गोपनीय माहीतीवरून सायबर फसवणूक करणा-या ०३ इसमांविरूध्द गु.प्र.शा, गु.अ.वि.येथे गु.र.क्र.१२१/२०२६ कलम ३१८(४), ६१, ४५, ३(५) भा.न्या.सं सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(ड) अन्वये गुन्हा नोंद करून पुढील तपास कक्ष ५ मार्फत सुरू आहे. सदर आरोपी हे स्वत:चे तसेच त्यांचे इतर साथीदारासह स्वत:च्या व इतरांच्या नावावर विविध बँकांमध्ये बँक खाती उघडून सदर बँक खात्यांशी लिंक करण्यासाठी स्वत:च्या व इतरांच्या नावावर विविध सिमकार्ड खरेदी करून घेतली. सदर बँक खाती उघडल्यानंतर त्यांची पासबुक, ATM कार्ड, चेकबुक, सिमकार्ड तसेच संब्रंधित बँक खात्यांशी निगडित इतर साधनांचा प्रत्यक्ष ताबा व नियंत्रण स्वत:कडे घेवून सदर खात्यांचा वापर हा सायबर फसवणूकसाठी करीत होते. त्यांचेकडून विविध बँकांची ८८ **पासबुक, १४३ चेकबुक, १०० एटीएम कार्ड , २४ मोबाईल, १६७ सिमकार्ड, २ लॅपटॉप जप्त करण्यात आले होते.**

त्यानंतर गुन्हयाचे पुढील तपासामध्ये तांत्रिक विश्लेषन व मानवी कौशल्याचे आधारे वारका, राज्य-गोवा येथुन दि.१३/०९/२०२६ रोजी रिसॉर्ट मधील एका व्हिला मधून सायबर फसवणूक ऑपरेट करणा-या ०७ आरोपीस अटक करण्यात आली आहे. त्यांच्याकडुन **१) विविध कंपनीचे ५९ मोबाईल फोन, २) वेगवेगळया कंपन्याचे एकूण १९ सिमकार्ड, ३) ०९ लॅपटॉप, ४) ५१ एटीएम, ५) १२ पासबुक व इतर साहीत्य** हस्तगत करण्यात आले आहे. आरोपीत इसमांनी आर्थीक फसवणूक रक्कम हस्तांतरीत करणेसाठी स्वत:चे ॲप्लीकेशन बनवुन त्याचा वापर केल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदर आरोपीतास मा. न्यायालयाने दिनांक २४/०९/२०२६ रोजीपर्यत पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे.

सदरची यशस्वी कामगिरी मा. पोलीस आयुक्त, मुंबई, श्री. देवेन भारती, मा. पोलीस सह आयुक्त (गुन्हे), मुंबई, श्री. अनिल कुंभारे, मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. कृष्ण कांत उपाध्याय, मा. पोलीस उप आयुक्त (प्रकटीकरण), श्री. राज तिलक रौशन, मा. सहा. पो. आयुक्त (मध्य), श्री. सदानंद राणे यांच्या मार्गदर्शनाखाली कक्ष ५ चे व.पो.नि. रोहिणी पोतदार, पोनि धराडे, पोनि तेलतुंबडे, स.पो.नि. धनराज चौधरी, स.पो.नि. सचिन बाराते, पो.उ.नि. इंगोले, पो.उ.नि. नितीन पालांडे, पोउनि अजय पोवार, पोउनि महेश अंजनवाड, पो.उ.नि. अंकुश न्यायनिगुर्णे, सफौ घाडगे, निरभवणे, पो.ह तानाजी पाटील, मुलाणी, काळे, लोहकरे,बनसोडे, पोशि भाउसो पवार यांनी केली आहे.

.....................................................................................................................................

Scanned with CamScanner